स्थायी समितीच्या **शुक्रवार दिनांक 10–06–2016** रोजी **दुपारी 12–00** वाजता सिव्हील कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृति, स्थायी समिती सभागृहात भरलेल्या सभेचा अहवाल.

## उपस्थित सभासद

| अ.क्र. | मा. सदस्य/सदस्यांचे नांव | पद |
|---|---|---|
| **1.** | मा. श्री. बंडू उर्फ सुधीर राऊत | सभापती |
| **2.** | मा. श्री. जगतराम सेवकराम सिन्हा | सदस्य |
| **3.** | मा. श्री. राजू भाऊराव नागूलवार | सदस्य |
| **4.** | मा. श्री. किशोर चिंधुजी गजभिये | सदस्या |
| **5.** | मा. श्री. जगदीश ग्वालबंशी | सदस्य |
| **6.** | मा. श्रीमती संगीता कळमकर | सदस्या |
| **7.** | मा. श्री. रामदास गुडधे | सदस्या |
| **8.** | मा. श्री. संजय महाकाळकर | सदस्या |
| **9.** | मा. श्री. सुरेश जग्यासी | सदस्या |
| **10.** | मा. श्रीमती कुमूदिनी कैकाडे | सदस्य |
| **11.** | मा. श्रीमती इफ्तीखर अशरफू | सदस्य |
| **12.** | मा. सौ. दिव्या धुरडे | सदस्या |
| **13.** | मा. श्री. गणेश उर्फ मुन्ना पोकूलवार | सदस्य |
| **14.** | मा. सौ. सरिता तिवारी | सदस्या |

## अनुपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| **1.** | मा. सौ. अश्विनी जिचकार | सदस्या |
| **2.** | मा. श्री. अनिल धावडे | सदस्य |

## उपस्थित अधिकारी

**1.** श्री. हरीश दुबे, निगम सचिव

मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेच्या कार्यवाहीला सुरुवात केली.

<u>ठराव क्रमांक 186</u>:— मौजा — जरीपटका, सिटी सर्व्हे क्र. 2087/2, नझुल भुखंड क्र. 05 येथील जमिन क्षेत्राावरील विकास योजनेतील टाऊन हॉल (आरक्षण क्र. NW - 87) या आरक्षणा अंतर्गत जमिन क्षेत्रा संपादनासाठी बजावलेल्या खरेदी सुचनेबाबत.

नागपूर शहराकरीता मंजुर विकास आराखडयामध्ये नमुद व आवश्यक असलेले ''टाऊन हॉल'' (आरक्षण क्र. NW- 87) चे आरक्षण मौजा — जरीपटका, सिटी सर्व्हे क्र. 2087/2, या जमिनीवरील आरक्षणातंर्गतचे एकुण क्षेत्र — 6144.00 चौ.मी.आहे.

उपरोक्त प्रमाणेच्या आरक्षीत जमिन क्षेत्रावर पुर्व मंजुर बांधकामे व मा. न्यायालयाचे दि. 27/01/2014 चे आदेशानुसार व्यपगत जागा वगळता आरक्षण विकसीत करण्यासाठी उपलब्ध 3570 चौ.मी. खुल्या जागेकरीता अंदाजीत **रू. 21,70,61,165/—** ची आवश्यकता आहे.

उपरोक्त जमिन क्षेत्रापैकी पट्टेधारक श्रीमती नगीना हकीमुद्दीन अकोलावाला (हीराणी) व इतर एक यांच्या नझुल भुखंड क्र. 5/1 पैकी 846.00 चौ.मी. आरक्षणाने बाधीत जागेचे संपादन करण्यास्तव आवश्यक अंदाजीत रू. 5,14,23,805/— च्या राशीची तरतुद उपलब्ध करून देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन आरक्षण क्र. NW-87 (टॉऊन हॉल) बाबत जागेच्या व्यवहार्यता तपासणे व मा. उच्च न्यायालयाचे निर्देश तपासणे आवश्यक आहे. तसेच आरक्षणा च्या जागेवर टॉऊन हॉल निर्माण होऊ शकतो का यांची शक्यता पडताळणे आवश्यक आहे. करीता मुख्य अभियंता यांनी या प्रकरणाचा अभ्यास करुन प्रत्यक्ष मौका पाहुन स्थायी समितीस एक महीन्यात अहवाल सादर करावा या सुचनेसह विषय कार्यालयास परत करण्यास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 187</u>:— नागपूर महानगरपालिकेतील निर्लेखित झालेली व निर्लेखन मूल्य निर्धारित झालेली एकूण 29 नग वाहने/मशिनरी 06 नग फॉगींग मशिन व एक लॉट निकामी टॉयर याचे सर्वेक्षक व मूल्य निर्धारण यांच्या तर्फे प्राप्त निर्लेखन मूल्य (1484000/—) दराच्या वर विक्री करण्याकरिता ई—निविदा बोलविण्याचा विषय समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजुरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 188</u>:— प्रभाग क्र. 19 अ, बारसेनगर येथे बांग्लादेश, तांडापेठ, चंद्रभागानगर येथे सी.सी.पेव्हमेंटच्या कामाकरिता करणे रु. 29,99,753/— च्या प्राकलनास मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 189</u>:— प्रभाग क्र. २५—ब येथे आर.टी.ओ. कार्यालया पासुन ते अग्रवाल बिछायत केन्द्र अग्रेसन रोड चे पुन:डांबरीकरण करण्याच्या कामास्तव रू. २९,९९,७१०/— च्या प्राकलनास प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 190</u>:— प्रभाग क्र. 69,70,72, स्वावलंबीनगर, जिवनछाया लेआउट, प्रोसेस सर्व्हेहर कॉलनी, सरस्वती लेआउट , श्रीनगर व इतर ठिकाणी रस्त्यांचे डांबरीकरणाचे कामास्तव प्राप्त निविदापैकी में. अमृत कंन्स्ट्रक्शन हयांची मुऴ रू 3000000 प्राकलनीय दरापेक्षा 2.5% टक्के अधिक दराची निविदा रूपये **3075000**/–( रूपये तीस लक्ष पंच्याहत्तर हजार रूपये फक्त ) स्विकृत करण्याचा व या कामाकरीता पद क्रमांक 681 (A22001330802) अंतर्गत तरतुद मुक्त करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 191</u>:— प्रभाग क्र. ६९ अंतर्गत सिंधी कॉलोनी खामला येथे रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या कामास्तव रू. ४९,९१,३८५/— च्या प्राकलनास प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 192</u>:— प्रभाग क्र. ४१ अ महाल येथे मातृसेवा संघ ते राजेन्द्र शाळेपर्यंत (कोठी रोड) सिमेंट कॉक्रींट रस्त्याचे बांधकाम करण्याचे कामास्तव प्राप्त १७ निविदांपैकी मे. हितेश कन्स्ट्रक्शन यांची प्राकलनिय दरांपेक्षा २३.२५ टक्के प्रतिशत ने कमी दरांची रू. ६६,६८,४३०/— रकमेची निम्नतम निविदा स्वीकृत करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 193</u>:— 'kklu fu.kZ; Ø- ukeik & 2308 & 680 & iz-Ø- & 358 & ufo & 26] fn- 01-04-2009 o 'kklu fu.kZ; Øekad ukeik & 2308 & 680 & iz-Ø- & 358 & ufo & 26 fnukad 08-09-2010 vUo;s izfl/n dj.;kr vkysY;k Øe'k% ukxiwj 'kgj ik.khiêh nj eqY;kadu olqyh mifo/kh 2009 o nq:Lrh mifo/kh 2010 P;k dye 56¼c½ vUo;s izkIr vf/kdkjkarxZr vk;qDr] e-u-ik- ;kauh lkscr lgi= & 1 oj tksMysY;k vkns'k Øekad ,e-lh-@355@2016] fn- 02-04-2016 vUo;s eatqj dsysys o fnukad 01-04-2016 iklwu ykxw dsysY;k lq/kkfjr njkaph ekghrh LFkk;h lehrhiq<s Bso.;kpk प्रश्न समितीने विचारात घेऊन समितीने एकमताने नोंद घेतली.

<u>ठराव क्रमांक 194</u>:— नागपूर महानगरपालिका अंतर्गत अशासकीय संस्था किंवा नेफ्रोलॉजीस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने पी.पी.पी. तत्वावर डायलिसीस सेवा अश्विीनी किडनी आणि डायलिसीस केंद्र, रामदासपेठ नागपूर व श्रवण हॉस्पीटल व किडणी इंस्टीटयुट, नंदनवन नागपूर या संस्थेमार्फत त्यांचे स्वतःचे खाजगी दवाखान्यात सुरु आहे. या अंतर्गत नागपूर महानगरपालिकेने सदर प्रकल्पाकरीता सिरो निगेटीव्ह रुग्णाकरीता रुपये 1000/— व सिरोपॉजीटीव्ह रुग्णांकरीता रुपये 1200/—प्रती रुग्ण (स्थायी समिती ठराव क्रमांक 116 नूसार) शुल्क आकारण्याची मंजूरी दिली आहे.

नागपूर महानगरपालिका अंतर्गत अशासकीय संस्था किंवा नेफ्रोलॉजीस्ट मार्फत चालविण्यात येणारे अतिरिक्त डायलिसीस केंद्र सुरु करण्यास्तचे प्रस्तावाला मा.आयुक्त यांनी पृष्ठ क्र.65/N नुसार मंजुरी प्रदान केली आहे. सदर प्रकल्प खालील नमुद म.न.पा. च्या मुख्य अटी व शर्तीनुसार चालविण्याकरीता स्थायी समितीची मंजुरी देण्यास्तव विचारात घेऊन तसेच,

१) नागपूर महानगरपालिका आरोग्य विभागा अंतर्गत पी.पी.पी.तत्वावर डायलिसीस सेवा पुरविण्याकरीता ज्या संस्था प्रस्ताव सादर करतील अश्या संस्थाचे प्रस्ताव तपासून ज्या संस्थाचे प्रस्ताव महानगरपालिका आरोग्य विभागाने डायलिसीस प्रकल्पाकरीता नेमून दिलेल्या अटी व शर्तीची पूर्तता करतील अशा संस्थाना ई.ओ.आय. न काढता मा.आयुक्त यांच्या परवानगीनुसार डायलिसीस प्रकल्पात सेवा देण्याची मंजूरी देण्यात येईल.

२) सदर प्रकल्पाकरीता अर्जदारास त्यांच्या स्वतःच्या खाजगी दवाखान्यामध्ये/संस्थेमध्ये डायलीसीस केंद्र चालु अवस्थेत अद्यावत असणे बंधनकारक आहे. कमीतकमी पाच डायलीसीस मशिन सुरु अवस्थेत उपलब्ध असलेले हॉस्पीटल/संस्था अर्ज सादर करण्यास पात्र राहतील.

३) डायलीसीस करीता लागणारी औषधे व कंजुमेबल्स (Dialyser, Tubing for Dialysis, Fistula needle set, Syringe set & transducer protector) व इतर साहित्य तसेच मनुष्यबळ (तज्ञ नेप्रफोलॉजीस्ट, मेडिकल स्टॉफ, प्रशासकीय कर्मचारी) यांची सेवा मोफत उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी संबधित खाजगी संस्थेची राहील.

४) डायलीसीस करण्याकरीता सिरोनिगेटिव्ह रुग्णांकरीता रुपये 1000/— (एक हजार रुपये) व सिरोपॉजिटिव्ह रुग्णांकरीता रुपये 1200/— (एक हजार दोनशे रुपये) आकारणे बंधनकारक राहील. हयापैकी सिरोनिगेटिव्ह रुग्णांकरीता संबधित संस्था रुग्णांकडुन रुपये 500/— (पाचशे रुपये) व आरोग्य विभाग महानगरपालिका नागपूर यांचेकडुन रुपये 500/— (पाचशे रुपये) तसेच सिरोपॉजिटिव्ह रुग्णांकरीता संबधित संस्था रुग्णांकडुन रुपये 600/— (सहाशे रुपये) व आरोग्य विभाग महानगरपालिका नागपूर यांचेकडुन रुपये 600/— ( सहाशे रुपये) आकारणे बंधनकारक राहील. उपरोक्त दरांकरीता स्थायी समिती दि.5.11.2011 ठराव क्र.116 नुसार तसेच दि.7.10. 2011 ठराव क्र.94 नुसार 10 वर्षाची मंजुरी अश्विनी आणि डायलिसीस केंद्र, प्रायव्हेट लिमिटेड रामदासपेठ, नागपूर यांना प्रदान केलेली आहे. त्यामुळे प्रकल्पामध्ये सहभागी होणा—या संस्थेला दि.6.10.2021 पर्यंत कार्यादेश देण्यात येईल. त्यानंतर सेवा आपोआप संपुष्टात येईल. सदर प्रकल्प चालू ठेवण्याकरीता योग्य ती प्रक्रिया करण्यात येईल.

५) सदर प्रकल्पाकरीता नागपूर महानगरपालिकेत नोंदणीकृत दवाखान्यालाच अर्ज सादर करता येईल.

उपरोक्त प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 195</u>:— सतरंजीपुरा झोन क्र. 7 अंतर्गत येत असलेल्या नेहरू पुतळा, नेहरू स्टेडियमच्या मागील भागात सुमारे 40 वर्षापासुन व्यवसाय करीत असलेले 5 व्यावसायीकांची नावे 1) श्री. बाबा उर्फ प्रमोदकुमार मानकर 2) श्री. मदन शंकरलाल गुप्ता 3) श्री. रतन गुप्ता 4) श्री. दिगांबर मानकर 5) श्री. नामदेव उरकुडाजी ढेंगरे व्यवसाय करीत असल्याचे नमुद आहे. त्या व्यवसायीकांनी परवान्यावर दुकाने/ओटे/जागा देण्याकरीता दि. 20/03/2015 तसेच दि. 11/02/2016 रोजीच्या अर्जाव्दारे नेहरू पुतळा, नेहरू स्टेडियमच्या पाठीमागील खचके व्यवसाय करणेकरीता मागणी केलेली आहे.

उक्त नेहरू पुतळा, नेहरू स्टेडियम मध्ये व्यवसाय करीत असलेल्या उक्त व्यवसायीकांची तसेच स्टेडियम मधील खचक्यांचे मौका चौकशी केली असता, (त्या खचक्या मध्ये) नेहरू पुतळा, नेहरू स्टेडियमच्या पाठीमागे वरिल पाचही व्यवसायीक मागील 40 वर्षापासुन वेगवेगळ्या प्रकारचे व्यवसाय करीत असल्याचे मौक्यावर आढळुन आले. करीता सदर प्रकरणात नगररचना विभागाकडुन सन 2015—16 चे मुल्यांकन दर प्राप्त करून 11 महिन्याचे अस्थायी परवान्यावर बाजार विभागाच्या अटि व शर्तीनुसार देण्यास हरकत वाटत नाही. यामुळे म.न.पा.चे आर्थिक उत्पन्नात भर पडेल.

सबब नेहरू पुतळा, नेहरू स्टेडियम येथील एकुण 5 खचके 1) श्री. बाबा उर्फ प्रमोदकुमार मानकर 2) श्री. मदन शंकरलाल गुप्ता 3) श्री. रतन गुप्ता 4) श्री. दिगांबर मानकर 5) श्री. नामदेव उरकुडाजी ढेंगरे यांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 332 (क) अन्वये अशी तरतुद असल्याने, महानगरपालिकेच्या बाजारातील दुकानांचे, गाळ्यांचे, जागेचे आवंटन हे जाहीर लिलावाने किंवा स्थायी समितीच्या मान्यतेने अशा विशेषाधिकाराचा खाजगीरित्या विक्री करून विनियोग करणेची तरतुद आहे. करीता कलम 332 (क) अन्वये वरिल पाचही व्यवसायीकांना नेहरू पुतळा, नेहरू स्टेडियमच्या पाठीमागील खचके11 महिन्याच्या अस्थायी परवान्यावर देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन प्रशासनाने प्रस्तावित केलेल्या विषयात भाडे पट्टया बाबत महीन्याच्या अस्थायी परवान्या बाबत भरणा राशीची स्पष्टता केली नाही, करीता प्रस्तावित विषय नामंजूर करण्यांत येतो, यास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 196</u>:— प्रभाग क्र. 33 अ सूर्यनगर मधील लता मंगेशकर उद्यान जवळील रस्ते डांबरीकरण करण्यास्तव रु. 49,58,221/— राशीचे प्राकलनास प्रशासकीय मंजुरी प्रदान करणेचा प्रश्न समितीने विचारात घेऊन तसेच,

सदर कामाकरिता मा. अध्यक्ष, स्थायी समिती यांनी पद क्र. A22001330802 मधून आर्थिक वर्ष 2015—2016 मध्ये रु. 50.00 लक्ष राशी तरतूद उपलब्ध करुन दिलेली आहे.

उपरोक्त प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 197</u>:— प्रभाग क्र. 38 अ व ब जुना बगडगंज येथे विविध ठिकाणी रस्त्याचे डांबरीकरण करण्यास्तव रु. 29,99,887/— राशीचे प्राकलनास प्रशासकीय मंजुरी प्रदान करणेचा प्रश्न समितीने विचारात घेऊन तसेच,

सदर कामाकरिता मा. अध्यक्ष, स्थायी समिती यांनी पद क्र. A22001330803 मधून आर्थिक वर्ष 2015—2016 मध्ये रु. 15.00 लक्ष प्रति नगरसेवक राशी तरतूद उपलब्ध करुन दिलेली आहे.

उपरोक्त प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 198</u>:— प्रभाग क्र. ४२ अ आणि ब जर्मन टॉवर व अहिरराव वाडा मस्जिद ते घाटबांदे यांच्या घरापर्यंत सिमेंट काँक्रीट रोडचे बांधकाम करण्याच्या कामास्तव तयार केलेल्या **रू. २९,९९,७३९/—** रकमेच्या प्राकलनास जूने पद क्र. ६८२ व नविन पद क्र. A२२००१३३०८०३ (Fix Priority) अंतर्गत प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याचा तसेच हे काम रितसर निविदा मागवून हाती घेण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 199</u>:— **झोन क्र.५, प्रभाग क्र. ४५ ब मधील श्रीकृष्ण नगर, शेष नगर व शक्तीमाता नगर येथे ६ मिटर खांब व एल.ई.डी. फिटिंग्ज लावण्याच्या रु. ४९,९५,६००/- च्या प्राकलनास तसेच हे काम ई निविदा व्दारे करण्यास मंजूरी देण्याचा** प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 200</u>:— प्रभाग क्र. २८ मोमिनपुरा अंतर्गत बोरीयापुरा, मौजा भानखेडा येथे सिटी सर्वे नं. ११३७, शीट नं. १७ मध्ये शासकीय जागेवर समाज भवनाचे बांधकाम करण्याचे कामास्तव प्राप्त ६ निविदांपैकी मे. सुविचार कन्स्ट्रक्शन यांची प्राकलनिय दरांपेक्षा ११.२ टक्के प्रतिशत ने कमी दरांची रु. ४४,३९,४४८/— रकमेची निम्नतम निविदा स्वीकृत करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 201</u>:— प्रभाग क्र. ४१ अ महाल येथे राजपथ चौक ते मनबाजी चौकापर्यंत सिमेंट काँक्रीट रोडचे बांधकाम करण्याच्या कामास्तव तयार केलेल्या **रू. ३४,९९,९४२/—** रकमेच्या प्राकलनास जूने पद क्र. ६७९ व नविन पद क्र. A42001470511 अंतर्गत प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याचा तसेच हे काम रितसर निविदा मागवून हाती घेण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 202</u>:— नागपूर शहराकरिता सिमेंट काँक्रीट रोड फेज—II अंतर्गत, पॅकेज—10 अंतर्गतील रस्ता क्र. 24 युनिर्व्हसिटी लायब्ररी चौक ते कल्पना बिल्डींग चौका पर्यंत, रस्ता क्र. 43—नरेंद्रनगर ब्रिजजवळ रिंग रोड ते विवेकानंदनगर चौक ते देवनगर चौकापर्यंत (गजानन नगर मार्गे), रस्ता क्र. 37—पंचशील चौक ते हम्पयार्ड रोड पर्यंतचा रस्ता इत्यादी रस्त्यांसाठी सिमेंट काँक्रीटचे रोड तयार करण्याकरिता प्राकलनीय राशी रु. 11,42,44,336/— ची निविदा बोलविण्यात आली असता, एकूण 03 निविदा प्राप्त झाल्या.

प्राप्त झालेल्या पात्र निविदांपैकी मे. एस.आर.के. इन्फ्रा. संयुक्त प्रा.लि. यांची प्राकलनीय दरांपेक्षा 10.00 टक्के कमी दराची रु. 10,28,19,902.40/— रकमेची असून यास दिनांक 20.05.2016 मा. निगम आयुक्त यांनी निविदा मंजुरीकरिता शिफारस केलेली असून निम्नतम दराची मे. एस.आर.के. इन्फ्रा. संयुक्त प्रा.लि. यांची निविदा मंजूर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन मेसर्स जे.पी.ई.—एस.आर.के. इन्फ्रा. संयुक्त प्रा. ली. या कार्यालयाने सुचविलेल्या दुरुस्तीसह विषयास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 203</u>:— Ukkxiwj 'kgj egkuxjikfydk ik.khiêh nj] eqY;kadu vkf.k olwyh ¼nw#Lrh½ mifo/kh 2010 e/khy oxZokjh R1,IA,IB o Lye varxZr eksM.kkÚ;k o fn- 31-03-2016 i;Zar ik.khiêhph :- 2000@& is{kk tkLr Fkdckdh vlysY;k ¼U;k;çfo"B çdj.ks oxGrk½ 50416 miHkksDR;kdMhy cdk;k jk'kh iSdh DPC ¼foyac'kqYd½ oxGwu fuOoG ik.khiêhph v/khZ jôe o laiw.kZ Fkdckdhojhy DPC ¼foyac'kqYd½ fuysZf[kr dj.;kpk iz'u egkjk"Vª egkuxjikfydk vf/kfu;e dye & 152] o 134¼3½ e/khy rjrwn fopkjkr ?ksÅu **foHkkxkus LFkk;h lferh lHksr fnysY;k lwpusuqlkj, Ukkxiwj 'kgj egkuxjikfydk ik.khiêh nj] eqY;kadu vkf.k olwyh ¼nw#Lrh½ mifo/kh 2010 e/khy oxZokjh R1,IA,IB o Lye varxZr eksM.kkÚ;k o fn- 15-06-2016 i;Zar ik.khiêhph :- 2000@& is{kk tkLr Fkdckdh vlysY;k ¼U;k;çfo"B çdj.ks oxGrk½ loZ miHkksDR;kdMhy fn- 31-03-2016 i;Zrph cdk;k jk'kh iSdh DPC ¼foyac'kqYd½ oxGwu fuOoG ik.khiêhph v/khZ jôe o laiw.kZ Fkdckdhojhy DPC ¼foyac'kqYd½ fuysZf[kr dj.ks ;k nq#Lrhlg fo"k;kl lferhus ,derkus eatwjh iznku dsyh-**

1- oxZokjh R1] IA] IB o Lye varxZr eksM.kkÚ;k miHkksDR;kaiSdh fn- 31-03-2016 i;Zar :-2000@& is{kk tkLr Fkdckdh vlysY;k cdk;k jk'kh iSdh ts miHkksDrs DPC ¼foyac'kqYd½ laiw.kZ Fkdckdhojhy DPC ¼foyac'kqYd½ jDde oxGwu fuOoG ik.khiêhph v/khZ jôe Hkjrhy rlsp 24x7 ik.khiqjoBk izdYik varxZr uG tksM.khps dke @ uohu feVjlg djowu ?ksrhy] R;kaps dMs Fkdckdh vlysY;k jk'kh iSdh DPC ¼foyac'kqYd½ oxGwu fuOoG ik.khiêhph v/khZ jôe iq.kZi.ks ,deq'r fdaok gIR;kr fofgr eqnrhr Hkjrhy R;kaph moZjhr ik.khiêhph jDde fuysZf[kr dj.;kpk iz'u lferhus fopkjkr ?ksÅu **oxZokjh R1] IA] IB o Lye varxZr eksM.kkÚ;k miHkksDR;kaiSdh fn- 15-06-2016 i;Zar :-2000@& is{kk tkLr Fkdckdh vlysY;k o 31-03-2016 i;ZarP;k cdk;k jk'kh iSdh ts miHkksDrs DPC ¼foyac'kqYd½ laiw.kZ Fkdckdhojhy DPC ¼foyac'kqYd½ jDde oxGwu fuOoG ik.khiêhph v/khZ jôe Hkjrhy rlsp 24x7**

**ik.khiqjoBk izdYik varxZr uG tksM.khps dke @ uohu feVjlg djowu ?ksrhy] R;kaps dMs Fkdckdh vlysY;k jk'kh iSdh DPC ¼foyac'kqYd½ oxGwu fuOoG ik.khiêhph v/khZ jôe iq.kZi.ks ,deq'r fdaok glR;kr fofgr eqnrhr Hkjrhy R;kaph moZjhr ik.khiêhph jDde fuysZf[kr dj.ks ;k nq#Lrhlg fo"k;kl lferhus ,derkus eatwjh iznku dsyh-**

2. gh loyr laca/khr miHkksDR;kauk izLrko dk;kZfUor >kY;kps rkj[ksiklqu iq<hy rhu efg.;ki;Zar vuqKs; Bso.;kpk iz'u lferhus fopkjkr ?ksÅu **gh loyr laca/khr miHkksDR;kauk 31 tqyS 2016 i;Zar vuqKs; Bso.ks ek= R;kauh 30 tqu 2016 i;Zar loyr fnY;kuarj vuqKs; gks.kkÚ;k jk'kh iSdh fdeku 50 VDds jk'khpk Hkj.kk dj.sk vko';d jkghy ;kl lferhus ,derkus eatwjh iznku dsyh-**
3. miHkksDrk oxZokjh R1] IA] IB o Lye varxZr eksM.kkÚ;k o fn- 31-03-2016 i;Zar :- 2000@& is{kk tkLr Fkdckdh vlysY;k loZ 50416 miHkksDR;kauh Fkdckdh jk'kh iSdh DPC ¼foyac'kqYd½ oxGwu fuOoG ik.khiêhph v/khZ jôe iq.kZi.ks fofgr eqnrhr HkjY;kl v'kk miHkksDR;kaph ,dq.k Fkdckdh jDde :- 109]22]70]682@& iSdh foyac 'kqYd ¼DPC½ jDde :- 19]13]77]899@& o fuOoG ik.khiêh Fkdckdh jDde :- 90]08]92]783@& ph v/khZ fuOoG ik.khiêh Fkdckdh jDde :- 45]04]46]392@& v'kh ,dq.k :- 64]18]24]291@& jôe fuysZf[kr dj.;kpk प्रश्न समितीने विचारात घेऊन प्रशासनाने सभेत दिलेल्या सुधारीत आकडेवारीप्रमाणे **miHkksDrk oxZokjh R1] IA] IB o Lye varxZr eksM.kkÚ;k o fn- 15-06-2016 i;Zar :- 2000@& is{kk tkLr Fkdckdh vlysY;k loZ miHkksDR;kauh 31-03-2016 i;ZarP;k Fkdckdh jk'kh iSdh DPC ¼foyac'kqYd½ oxGwu fuOoG ik.khiêhph v/khZ jôe iq.kZi.ks fofgr eqnrhr HkjY;kl v'kk miHkksDR;kaph ,dq.k vankkts Fkdckdh jDde :- 116 dksVh iSdh foyac 'kqYd ¼DPC½ jDde vankts :- 48 dksVh o fuOoG ik.khiêh Fkdckdh jDde :- 68 dksVh ph v/khZ fuOoG ik.khiêh Fkdckdh jDde :- 34 dksVh v'kh ,dq.k :- 82 dksVh jôe fuysZf[kr dj.ks ;k nq#Lrhlg fo"k;kl lferhus ,derkus eatwjh iznku dsyh-**
4. fofgr eqnrhr ts miHkksDrs Fkdckdh vlysY;k jk'kh iSdh DPC ¼foyac'kqYd½ oxGwu fuOoG ik.khiêhph v/khZ jôe iq.kZi.ks Hkj.kkj ukgh R;k miHkksDR;kauk ik.khiêhph eqG Fkdckdh ¼foyac 'kqYdklg½ jDde Hkj.ks ca/kudkjd jkghy- mijksDr fu/kkZjhr dsysY;k eqnrhuarj v'kk miHkksDR;kapk Fkdckdh ckcr dks.krkgh mtj xzká /kj.;kr ;s.kkj ukgh- o rs ik.khiêh mifo/khP;k rjrqnhuwlkj naMuh; dkjokbZl ik= gksrhy ;kl lferhus ,derkus eatwjh iznku dsyh-

**dk;Zdkjh vfHk;ark¼tyiznk;½ Jh-xk;dokM%& ek-lHkkirh egksn;] fo"k; Ø-190 e/;s iq<hy izek.ks nq#Lrh d#u gk fo"k; eatqj djkok-**

**Ukkxiwj 'kgj egkuxjikfydk ik.khiêh nj] eqY;kadu vkf.k olwyh ¼nw#Lrh½ mifo/kh 2010 e/khy oxZokjh R1,IA,IB o Lye varxZr eksM.kkÚ;k o fn- 15-06-2016 i;Zar ik.khiêhph :- 2000@& is{kk tkLr Fkdckdh vlysY;k ¼U;k;çfo"B çdj.ks oxGrk½ loZ miHkksDR;kdMhy fn- 31-03-2016 i;Zrph cdk;k jk'kh iSdh DPC ¼foyac'kqYd½ oxGwu fuOoG ik.khiêhph v/khZ jôe o laiw.kZ Fkdckdhojhy DPC ¼foyac'kqYd½ fuysZf[kr dj.ks-**

**vuq- 1 e/;s %& oxZokjh R1] IA] IB o Lye varxZr eksM.kkÚ;k miHkksDR;kaiSdh fn- 15-06-2016 i;Zar :-2000@& is{kk tkLr Fkdckdh vlysY;k o 31-03-2016 i;ZarP;k cdk;k jk'kh iSdh ts miHkksDrs DPC ¼foyac'kqYd½ laiw.kZ Fkdckdhojhy DPC ¼foyac'kqYd½ jDde oxGwu fuOoG ik.khiêhph v/khZ jôe Hkjrhy rlsp 24x7 ik.khiqjoBk izdYik varxZr uG tksM.khps dke @ uohu feVjlg djowu ?ksrhy] R;kaps dMs Fkdckdh vlysY;k jk'kh iSdh DPC ¼foyac'kqYd½ oxGwu fuOoG ik.khiêhph v/khZ jôe iq.kZi.ks ,deq'r fdaok gIR;kr fofgr eqnrhr Hkjrhy R;kaph moZjhr ik.khiêhph jDde fuysZf[kr dj.ks-**

**vuq- 2 e/;s %& gh loyr laca/khr miHkksDR;kauk 31 tqyS 2016 i;Zar vuqKs; Bso.ks ek= R;kauh 30 tqu 2016 i;Zar loyr fnY;kuarj vuqKs; gks.kkÚ;k jk'kh iSdh fdeku 50 VDds jk'khpk Hkj.kk dj.sk-**

**vuq- 3 e/;s %&** प्रशासनाने सभेत दिलेल्या सुधारीत आकडेवारीप्रमाणे **miHkksDrk oxZokjh R1] IA] IB o Lye varxZr eksM.kkÚ;k o fn- 15-06-2016 i;Zar :- 2000@& is{kk tkLr Fkdckdh vlysY;k loZ miHkksDR;kauh 31-03-2016 i;ZarP;k Fkdckdh jk'kh iSdh DPC ¼foyac'kqYd½ oxGwu fuOoG ik.khiêhph v/khZ jôe iq.kZi.ks fofgr eqnrhr HkjY;kl v'kk miHkksDR;kaph ,dq.k vankkts Fkdckdh jDde :- 116 dksVh iSdh foyac 'kqYd ¼DPC½ jDde vankts :- 48 dksVh o fuOoG ik.khiêh Fkdckdh jDde :- 68 dksVh ph v/khZ fuOoG ik.khiêh Fkdckdh jDde :- 34 dksVh v'kh ,dq.k :- 82 dksVh jôe fuysZf[kr dj.ks-**

**Inj fo"k;kr mijksDr nq#Lrh djkoh vls ek- vk;qDr egksn;kauh lqfpr dsys vkgs-**

<u>ठराव क्रमांक 204</u>:— प्रभाग क्रं. ४५ अ—ब, वाठोडा येथील उमीया कॉलनी, डायमंड नगर आणि हसनबाग—।। अंतर्गत

रस्त्याचे डांबरीकरण करण्याचे कामास्तव रू. २९,९९,७४५/— रकमेच्या प्राकलनास प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 205:— प्रभाग क्र. ३३ (अ) सूर्यनगर येथे नविन उद्यान निर्मीतीसाठी विविध कामे करण्याचे एकत्रित रू. २६,२२,६६०/— च्या प्राकलनास मंजूरी प्रदान करून कामनिहाय निविदा मागविण्यास मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 206:— हनुमाननगर झोन क्र. ०३ प्रभाग समिती ठराव क्र. ०३ दि. २४/०५/२०१६ अन्वये, सन २०१६—१७ चे अंदाजपत्रकात मा. सदस्यांनी सुचविलेल्या दुरुस्तीसह एकमताने प्रभाग समितीने मंजुरी प्रदान केली.

त्यास अनुसरुन मा. प्रभाग समितीच्या सदस्यांच्या सूचना विचारात घेऊन हनुमाननगर झोन क्र. ०३ करीता तयार केलेल्या वर्ष २०१६—१७ चे पुनर्विनियोजन अंदाजपत्रकास (परिशिष्ट 'अ') स्थायी समितीची मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 207:— नागपूर शहराकरिता सिमेंट काँक्रीट रोड फेज-II अंतर्गत पॅकेज —17 अंतर्गातील 1) 8—पूर्व नागपूर मधील बगडगंज रोड ते भंडारा रोड (छापरु कॉलनी मधून) पर्यंत रस्ता 2) 11—सुनिल हॉटेल ते टेलिफोन एक्सचेंज चौकापर्यंतचा सिमेंट काँक्रीट रस्त्याचा विकास करण्यास्तव प्राप्त मे. डी.सी.गुरुबक्षाणी यांची प्राकलनीय राशी रु. 1,20,310,223/— पेक्षा 6.95 टक्के कमी रु. 111,948,662/— राशीची निम्नतम निविदा स्वीकारण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 208:— नागपूर शहराकरीता सिमेंट कॉंक्रिट रोड फेज—II अंतर्गत, पॅकेज—12 मधील 1) रस्ता क्र. 32 श्रीकृष्ण नगर रोड — के.डी.के कॉलेज टि पॉईट ते श्रीकृष्ण नगर चौका पर्यंत, 2) रस्ता क्र. 38 आर्शिवाद नगर रोड — रिंग रोड वरील विदर्भ प्रिमीअर बिल्डींग ते आशिर्वाद नगर मार्गे हुसैन बाबा दरगाह पर्यंत, 3) रस्ता क्र. 41 — रेशीमबाग येथील डॉ. हेडगेवार गेट ते गजानन चौक ते सक्करदरा ते संगम टॉकीज चौका पर्यंत हे रस्ते सिमेंट कॉंक्रिट चे तयार करण्याकरीता अर्हता प्राप्त 03 निविदापैकी M/s. JPE-SRK Infra (JV) यांची प्राकलनीय दरांपेक्षा 10.00 टक्के ने कमी दराची रू. 11,15,62,416/— रकमेची निविदा निम्नतम आहे. करिता खालील प्रमाणे प्रस्ताव मंजूरीचा प्रश्न समितीने विचारात घेऊन,

1. पॅकेज क्र. 12 — प्राकलनीय राशी रू. 13,69,73,855/— ला प्रशासकिय मान्यता प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

2. वरील प्रमाणे M/s. JPE-SRK Infra (JV) यांची प्राकलनीय दरांपेक्षा 10.00 टक्के ने कमी दराची रू. 11,15,62,416/- रकमेची निम्नतम निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 209</u>:- नागपूर शहराकरीता सिमेंट कॉक्रिट रोड फेज-II अंतर्गत, पॅकेज-18 1) रस्ता क्र. 28 भंडारा रोड-जुना बगडगंज रोड ते आंबेडकर चौक ते सुदर्शन नगर चौक पर्यंत रस्ता 2) रस्ता क्र. 47-लकडगंज काबरा पेट्रोलपंप ते नागपूर नागरिक सहकारी बँक पर्यंत रस्ता 3) रस्ता क्र. 50 भंडारा रोड-सुदर्शन नगर चौक ते अन्नपुर्णा दाल मील (स्मॉल स्केल इंडस्ट्री) पर्यंतचा रस्ता सिमेंट कॉंक्रीट द्वारा विकास करण्यास्तव प्राप्त मे. डी.सी.गुरुबक्षाणी यांची प्राकलनीय राशी रु. 103,303,564/- पेक्षा 5.65 टक्के कमी रु. 97,466,913/- राशीची निम्नतम निविदा स्वीकारण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 210</u>:- नागपूर शहरात मौजा वाठोडा येथे कौशल्य विकास विद्यापीठ व व्यवस्थापन केंद्र निर्माण करण्यासाठी स्वारस्य अभिव्यक्ती (EOI) मागविण्यास्तव दस्ताऐवज तयार करण्यास्तव सल्लागार संस्थाची नियुक्ती करणे.

जगातील विकसित देशातील उपलब्ध अत्याधुनिक तंत्रज्ञानाशी स्पर्धा करण्याकरिता भारतासारख्या विकसनशील देशातसुध्दा तुल्यबळ कुशल मनुष्यबळ निर्माण व्हावे, तरूणांना, महिला, व दुर्लक्षित वर्गास हे तांत्रिक ज्ञान प्राप्त होवून स्वयंरोजगारांच्या मुबलक संधी उपलब्ध व्हाव्यात विविध आंतरराष्ट्रीय कंपन्याना /उद्योजकांना कुशल कर्मचारी उपलब्ध व्हावेत तसेच देशातील नागरिकांच्या राहणीमानाचा दर्जा वाढावा या उद्‌देशाने मा. प्रधानमंत्री यांनी राष्ट्रीय स्तरावर सत्र 2022 पर्यंत सुमारे 500 दशलक्ष कुशल कर्मचारी निर्माण व्हावे असे उद्‌दीष्ट ठेवले आहे. त्याचप्रमाणे महाराष्ट्र शासनाने Gross National Domestic Product च्या 13 टक्के व भारताच्या लोकसंख्येच्या 9.28 टक्के हिस्सा लाभान्वित व्हावा हे ध्येय ठेवून विविध स्तरावर राज्य / विभाग/ जिल्हा कौशल्य विकास समित्या निर्माण केल्या असून सन 2022 पर्यंत 45 दशलक्ष विशेष स्पर्धात्मक तांत्रिक कौशल्य असणारे मनुष्यबळ निर्माण करण्याचा संकल्प केला आहे.

नागपूर शहराची औद्योगिक विकासाची गरज, गती, व त्या अनुषंगाने कौशल्ययुक्त मनुष्यबळ निर्मितीसाठी बदलत्या काळाशी सुसंगत असे कौशल्य प्रशिक्षणाचे, व्यवस्थापन शास्त्र इत्यादी अद्यावत विद्याशास्त्राचे प्रशिक्षण देणा-या विद्यापीठ/विद्यापीठ उपकेंद्र/तत्सम संस्था यांचेकडुन मनपाच्या वाठोडा येथील सुमारे 102 एकर जागेवर उक्त प्रकारचे शिक्षण/प्रशिक्षण देणारे केंद्र उभारले जावे व त्या योगे शहर परिसरातील विद्यार्थ्यांना अध्ययनाचे अद्यावत केंद्र उपलब्ध व्हावे आणि अशा संस्थेतुन शिक्षण घेवून बाहेर पडणारे प्रशिक्षित मनुष्यबळ शहराच्या औद्योगिक, वाणिज्यिक इ. गरजांसाठी उपलब्ध व्हावे तसेच अधिकाधिक विद्यार्थ्यांना रोजगाराचे कौशल्य प्राप्त होवून त्यांना प्रशिक्षण/रोजगारांच्या संधी उपलब्ध होतील, तसेच राहणीमान उंचावेल असे सदर प्रस्तावाचे स्वरूप आहे.

यास्तव नागपूर महानगरपालिकेच्या दि. 19.03.2015 भरलेल्या स्थगित सर्वसाधारण सभेतील ठराव क्र. 78 अन्वये उक्त जागेवर महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम 1966 चे कलम 37 अन्वये फेरबदल करण्याची प्रस्ताव शासनास मंजुरीस्तव सादर करण्याकरिता मा. आयुक्त मनपा नागपूर यांना अधिकार प्रदान करण्यात आले आहेत.

नगर विकास विभागाची अधिसूचना दि. 27.01.2016 अन्वये नागपूर म.न.पा. क्षेत्रात, मौजा वाठोडा येथील ख. क्र. 114, 115(1)(2)(3), 116(1)(2), 167, 168(1)(2), 169(1)(2), 170, 171, 174, 180,(1)(2) व मौजा भांडेवाडी येथील ख.क्र. 137/2, 138, 139 व 167/1 मधील 102.52 एकर क्षेत्र हे सिवेज फार्म मधुनवगळुन "कौशल्य विकास विद्यापीठ व व्यवस्थापन केंद्र" "Skill Development, University and Management Centre" हया नामाभिधानाने आरक्षित आहे.

या कामी अशा क्षेत्रातील अनुभवी विद्यापीठे/संस्थाकडुन उचित प्रस्ताव मागविणेसाठी स्वारस्य अभिव्यक्ती सूचनेचा (EOI) मसुदा तयार करून योग्य संस्थेची निवड करण्याचे प्रयोजनाकरीता सल्लागार संस्था नेमणे आवश्यक आहे.

त्यादृष्टीने महाराष्ट्र शासनाच्या पॅनलवरील शासन निर्णय क्र. PPP/2014/CR-19/SP/GAD, मंत्रालय, मुंबई, दिनांक 17 सप्टेंबर 2014 च्या निर्णयान्वये शासन स्तरावर मंजूर असलेल्या सल्लागार संस्थाची माहिती घेतली असता, त्या यादीतील नागपूर शहरातीलच एकमेव मे. एक्सिनो कॅपिटल सर्विसेस लि. ही संस्था असल्याचे आढळले. म.न.पा. स्थायी समिती ठराव क्र. 499, दि. 20.01.2016 अन्वये अशा संस्थेकडुन निविदापूर्व काम करून घेण्यासाठी प्रकल्प किंमतीच्या 0.1 टक्के अथवा महत्तम रू. 10 लक्ष असे मानधन मंजूर आहे. त्यानुसार त्यांना विचारणा करण्यात आली. परंतु त्यांनी प्रकल्प राशीच्या 0.80 टक्के व नंतर वाटाघाटीने 0.467 टक्के वर कामाची तयारी दर्शविली. परंतु प्राथमिक अवस्थेत प्रकल्पाची किंमत ठरत नसल्याने त्यांच्या एकूण देय रकमेचा अंदाज घेता येत नाही. त्यामुळे त्यांना lump sump दर कमी करण्याची विनंती केली. अंतीमतः दि. 10.05.2016 चे पत्राद्वारे सदर कामाचे स्वरूप व व्याप्ती लक्षात घेता वरील मंजूर मर्यादा रू. 10 लक्ष मध्ये अशा मोठया प्रकल्पाचे निविदापूर्व सर्व औपचारीकतांचे काम होवू शकत नाही, असे संस्थेने कळविले असून या कामी रू. 24 लक्ष (सेवा शुल्क वगळता) (14.50 टक्के सेवा शुल्कासह रू. 27.48 लक्ष) फी मध्ये काम करण्यास तयारी दर्शविली.

सदर प्रकल्पाचे नागपूर शहराकरिता महत्व व नगर विकास विभाग शासन निर्णय क्र. TPS/2415/प्रक्र.192/2015/नवि.9, मंत्रालय मुंबई, दि. 27 जानेवारी 2016 अन्वये मंजुर करण्यात आलेल्या, "कौशल्य विकास विद्यापीठ व व्यवस्थापन केंद्र" "Skill Development, University and Management Centre" च्या अनुषंगाने अश्याप्रकारचे विद्यापीठ लवकरात लवकर तयार होवून त्याचा लाभ शहराकरीता व्हावा याकरीता विविध स्तरावरून सतत होणा-या पाठपुराव्याच्या अनुषंगाने या प्रकल्पाच्या निविदापूर्व प्रक्रियेकरिता सल्लागाराची त्वरित नेमणूक करण्याची बाब विचाराधिन आहे. अशा परिस्थितीत अशा विशिष्ठ प्रकारच्या कामाकरिता बिना निविदा मागविता काम करावयाचे झाल्यास मनपा अधिनियमाच्या परिशिष्ठ 5 प्रकरण 2 पूढे दिलेल्या परंतुका नुसार बिना निविदा काम दयावयाचे झाल्यास स्थायी समितीची मंजुरी घ्यावी असा नियम आहे.

**सदर संस्थेस खालील प्रमाणे मोठया प्रकल्पाचा अनुभव आहे.**

मनपाचे बुधवार बाजार सक्करदरा व रामेश्वरी बाजाराचा विकास, उत्तरप्रदेश परिवहन मंडळ, विशाखापट्टम मनपा पर्यटन प्रकल्प, भारतीय रेल्वे स्टेशन विकास महामंडळ नवी दिल्ली यांचेकरिता सुरत रेल्वे स्टेशन विकास प्रकल्प, चिदंबरानर पोर्ट

ट्रस्ट तुतीकोरीन इत्यादी मोठया कामाचा अनुभव आहे. या खेरीज सदर संस्था महाराष्ट्र शासनाचे सामान्य प्रशासन विभागाचे शा.वि. दि. 17.09.2014 चे अन्वये शासनाचा पॅनलवर आहे. ही संस्था शहरातच असल्याने त्यांना शहर परिसर, औद्यागिक क्षेत्र व विकास आराखडा इत्यादी बाबत चांगली माहिती असुन संस्थेचे अधिकारी on call उपस्थित होवू शकतात. अशा संस्थेला निविदा न बोलविता सदर काम देणे योग्य राहील असे कार्यालयास वाटते.

उपरोक्त बाबी लक्षात व वाटाघाटीनंतरचा संस्थेचा देकार बघता संस्थेस सदर काम देण्यासंबंधाने निर्णय घेण्यास हरकत नसावी. परंतु संपूर्ण परिस्थितीचा सार्वत्रिक विचार करून त्यास स्थायी समितीने उचित निर्णय घेवून पारीत करण्याच्या निर्णयास्तव सादर.

**कामाचे स्वरूप व व्याप्ती.**

- Preparation of Pre-feasibility study of the project;
- Detailed Techno-Commercial Feasibility & Appraisal on approval of the Draft FSR;
- Preparation of Layout Plan and Financial Modeling with various scenarios for the Project Development;
- RFQ/RFP Document, legal and financial vetting thereof;
- DCA and Finalization of Concession Agreement;
- Assisting in Pre bid meeting;
- Assistance in selection of suitable private partner(s)/ Developer(s) through a transparent and competitive process;
- Preparation of concession agreement document and it's legal and financial vetting.
- Preparation of Bid Evaluation Report on the basis of the shortlisted bids;
- Execution of Concession Agreement;
- Assistance in Financial Closure of the Project, as may be required;
- Preparation of Tender document for appointment of PMC, appointment and Recommendation on for PMC.

कामाकरिता टप्पेनिहाय देय राशी

| Sr. No. | Stage of work (Scope of Work) TOR | Time period form Agreement | Payment terms |
|---|---|---|---|
| 1. | Pre feasibility study, submission of conceptual design and financial model | 3 weeks | 30% |
| 2 | Submission of RFP Document and Concession Agreement | 3 Weeks | 25% |
| 3 | Submission of Bid Evolution Report | 3 Weeks | 20% |
| 4 | Signing of Concession Agreement | 2 Weeks | 15% |
| 5 | After completion of financial closure and appointment of PMC for actual execution of work | -- | 10% |

सबब, नागपूर शहरात मौजा वाठोडा येथील ख. क्र. 114, 115(1)(2)(3), 116(1)(2), 167, 168(1)(2), 169(1)(2), 170, 171, 174, 180,(1)(2) व मौजा भांडेवाडी

येथील ख.क्र. 137/2, 138, 139 व 167/1 मधील 102.52 एकर क्षेत्र येथे "कौशल्य विकास विद्यापीठ व व्यवस्थापन केंद्र" / "Skill Development, University and Management Centre" निर्माण करण्याचे कामाकरिता EOI मागविण्याचे हेतूने Pre Tender Activity करिता मे. एक्सिनो कॅपिटल सर्विसेस यांची पद क्र. A 22801322807 अंतर्गत एकमुक्त (consolidated) रूपये 24.00 लक्ष सेवा शुल्क वगळुन व 14.50 टक्के व सेवाशुल्कासह रूपये 27.48 लक्ष राशीवर नियुक्ती करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 211</u>:– नागपूर शहर मंजुर विकास आराखडया नुसार, प्रभाग क्र.५१ येथिल सेन्ट्रल बाजार रोड कल्पना बिल्डींग पासून ते दक्षिण अंबाझरी रोड आय. टि. आय पर्यंतचा ई. पी. ११६, २४ मीटर रूंदीचा रस्ता विकासीत करण्यास्तव रू. ७,२१,२०,०६२/– (सात कोटी एकवीस लक्ष विस हजार रूपये फक्त) च्या प्राकलनास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 212</u>:– नागपूर शहर मंजुर विकास आराखडया नुसार, प्रभाग क्र. ६८ मौजा चिचभवन येथिल १२ मिटर रूंदीचा रस्ता विकासीत करण्याकरीता रू. २.४५ कोटी च्या ढोबळ प्राकलनास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 213</u>:– नागपूर मनपाच्या शाळेतील वर्ग बालवाडी ते वर्ग 5 वी पर्यंतच्या एकूण 14000 विद्यार्थ्यांकरिता 14000 स्कुल बॅग खरेदी करावयाचे आहे. खरेदी नियमित ''ई'' निविदा मागवून करण्यात येईल. स्कुल बॅग खरेदी करण्यास रू. 42,00,000/– (अक्षरी बेचाळीस लक्ष) चा खर्च अपेक्षित राहील. करिता स्कुल बॅग खरेदी करण्याच्या अनुषंगाने येणाऱ्या रू. 42/– लक्ष च्या खर्चास तसेच खरेदीस मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन,

खर्च पद क्र. A25202020808 (प्राथ. माध्यमिक व कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांकरिता पाठयपुस्तक, वहया, दफ्तर इ. साहित्य खरेदी) या लेखा शिर्ष मधून करण्यात येईल

उपरोक्त प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 214</u>:– धंतोली झोन क्र. 4 प्रभाग समिती ठराव क्र. 03 दि.24.05 2016 अन्वये सन 2016–17 चे अंदाजपत्रकात मा. सदस्यांनी सुचविलेल्या दुरुस्तीसह एकमताने प्रभाग समितीने मंजुरी प्रदान केली.

त्यास अनुसरुन, मा. प्रभाग समितीच्या सदस्यांच्या सुचना विचारात घेऊन धंतोली झोन क्र. 04 करीता तयार केलेल्या वर्ष 2016–17 चे पुनर्विनियोजन अंदाजपत्रकात (परिशिष्ट अ व ब) स्थायी समितीची मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**<u>ठराव क्रमांक 215ः–</u>** सी.सी. रोड फेज–।। अंतर्गत नागपूर शहरातील साधारणतः ७०.०० की.मी. लांबीचे एकूण ५५ रस्ते सिमेंटीकरण करावयाचे असून एकूण ढोबळ प्रकल्प राशी ३२४ कोटी अपेक्षीत आहे. या प्रकल्पातंर्गत समाविष्ट रस्त्यांचे एकूण २२ पॅकेजेसमध्ये स्थायी समिती ठराव क्र. १६१ दिनांक १०.०९.२०१५ नुसार विभाजण करण्यात आले असून, पॅकेजनिहाय कामांना तांत्रिक मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. वर उल्लेखित केल्यानुसार काही १८ पॅकेजेस करिता निविदा बोलविण्यात आलेल्या आहेत व ०६ पॅकेजेस करिता कार्यादेश निर्गमित करण्यात आलेले असून उर्वरित कामांच्या निविदा प्रक्रिया अंतिम टप्प्यात असून या कामांचे कार्यादेश सुध्दा नजिकच्या काळात निर्गमित होतील.

फेज–।। अंतर्गतील कामे विहित कालावधीत पूर्ण होण्याच्या दृष्टीने तांत्रिक मनुष्यबळाची आवश्यकता आहे. विभागाकडे पुरेसे तांत्रिक मनुष्यबळ उपलब्ध नाही. प्रकल्पाचे वैशिष्टय, दर्जा, कामाची गुणवत्ता तसेच कामे विहित कालावधीत पूर्ण करण्यास्तव कामाची गती राखण्याकरिता तांत्रिक कर्मचाऱ्यांची उणीव बघता, मासिक पारिश्रमिक तत्वावर (Monthly fix Payment) वर अस्थायी तांत्रिक मनुष्यबळाची नियुक्ती करणे क्रमप्राप्त आहे.

उक्त प्रकल्पाची व्याप्ती तसेच हा प्रकल्प गुणवत्तापूर्वक विहित कालावधीत यशस्वीरित्या राबविणे क्रमप्राप्त असल्याने व महानगरपालिकेकडे पर्यवेक्षकीय तांत्रिक मनुष्यबळ (कर्मचारी) अत्यल्प प्रमाणात असल्याने यासंदर्भात मा. महापौर, मा. अध्यक्ष, स्थायी समिती, मा. मुख्य अभियंता, कार्यकारी अभियंता (प्रकल्प) यांचे समवेत वेळोवेळी झालेल्या चर्चेअंती पुढील प्रमाणे निकष अंतिम करण्यात आलेत.

१. उप अभियंता संवर्गातील शासकीय विभागातील अनुभवी सेवानिवृत्त अभियंता यांना करारपध्द्तीने विवक्षित कामा करिता मासिक पारिश्रमिक तत्वावर नियुक्त करणे (शासन निर्णय दि. ०८.०१.२०१६). प्रकल्पातंर्गातील प्रत्येक पॅकेजमधील रस्त्यांची एकुण लांबी सुमारे ३ ते ४ कि.मी. असुन एका उप अभियंत्यास १२ कि.मी. (साधारणतः ०३ पॅकेजेस) रस्त्यांचे कामांचे समन्वयन/नियंत्रण करता येणे शक्य आहे. या निकषानुसार २२ पॅकेजेस करिता एकुण ०७ अस्थायी उप अभियंता व मुख्यालय स्तरावर प्रकल्पाचे समन्वयनाकरीता ०१ उप अभियंता , याप्रमाणे एकूण ०८ उप अभियंता, मासिक पारिश्रमिक तत्वावर प्रकल्प राबविण्याकरिता तात्पुरत्या स्वरूपात नियुक्त करणे.

२. कनिष्ठ अभियंता या संवर्गातील कामे करण्यासाठी स्थापत्य अभियांत्रिकी शाखेची पदवी प्राप्त अभियंता यांची मासिक पारिश्रमिक तत्वावर नियुक्ती करणे. २

पॅकेज करिता एक पदवीधारक साईट इंजिनियर याप्रमाणे २२ पॅकेजेस करिता ११ व मुख्यालयातील समन्वयनाकरिता २ पदवीधारक असे एकुण १३ अस्थायी साईट इंजिनिअरची मासिक पारिश्रमिक तत्वावर तात्पुरती नियुक्ती करणे.

३. कामाच्या मौक्यावरील गुणवत्तेची देखरेख व कंत्राटदाराच्या प्लान्ट वरील सामुग्रीची गुणवत्ता राखण्याकरीता स्थापत्य अभियांत्रिकी संवर्गातील पदवीकाधारक अभियंता तसेच त्यांचे मदतनिस म्हणून आय.टी.आय. उत्तीर्ण झालेल्यांची सुपरव्हाईजर या पदावर नियुक्ती करणे. पॅकेजनिहाय कामाकरिता साईट इंजिनियरचे अधिनस्त प्रत्यक्ष मौक्यावरील पर्यवेक्षकीय देखरेख तसेच विविध चाचणी घेण्याकरिता व कंत्राटदाराचे आर.एम.सी. प्लॅन्ट वरील बांधकाम साहीत्य/सामुग्रीचा

दर्जा, गुणवत्ता तपासणीचे कामास्तव १ पदवीकाधारक व १ औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतून उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र धारकांची नियुक्ती करणे गरजेचे आहे. या निकषानुसार प्रत्यक्ष मौक्यावरील कामाची देखरेख/विविध चाचणी घेण्याकरिता व आर.एम.सी. प्लॅंट वरील साहीत्य/सामग्रीचा दर्जा व गुणवत्ता तपासणीचे कामाकरिता तसेच मुख्यालयातील समन्वयनाकरिता २ पदवीकाधारक असे एकूण २४ पदविकाधारक व २२ आय.टी.आय.उत्तीर्ण साईट सुपरव्हाईजरची मासिक पारिश्रमिक तत्वावर तात्पुरत्या स्वरूपात नियुक्ती करणे गरजेचे आहे.

(अ) उक्त संरचनेप्रमाणे शासकीय विभागातील नुकतेच सेवानिवृत्त उप अभियंता, पदवीधारक साईट इंजिनियर, पदविकाधारक व आय.टी.आय. उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्रधारक साईट सुपरव्हाईजर यांची एकूण संख्या व मासिक पारिश्रमिक तसेच प्रकल्प कालावधी करिता एकूण अनुमानित येणारा खर्च दर्शविणारा तपशील तक्ता ‘अ’ प्रमाणे आहे.

**तक्ता ‘अ’**

| कर्मचारी वर्ग | संख्या | वेतनमान प्रति महिना/प्रती कर्मचारी | ११ महिन्याचे वेतनमान |
|---|---|---|---|
| सेवानिवृत्त उप अभियंता | ०८ | ४०,०००/— | ३५,२०,०००/— |
| पदवीधारक साईट इंजिनिअर | १३ | ३०,०००/— | ४२,९०,०००/— |
| पदवीधारक सुपरव्हाईजर | २४ | २०,०००/— | ५२,८०,०००/— |
| आय.टी.आय.धारक सुपरव्हाईजर | २२ | १०,०००/— | २४,२०,०००/— |
| | | **एकूण अनुमानित खर्च रू. ..** | **१,५५,१०,०००/—** |

ब) प्रत्यक्ष कामे करताना गुणवत्ता राखण्याकरिता एकूण चाचण्यांपैकी १० टक्के चाचण्या “Third Party Investigation” चा भाग म्हणून NABL Accrediated प्रयोगशाळे मार्फत कंत्राटदाराच्या स्वखर्चाने चाचण्या करणे आहेच मात्र प्रत्यक्ष मौक्यावर देखील कामे होत असतांना गुणवत्ता राखण्याच्या दृष्टीने साहित्यांची गुणवत्ता तपासणे, वारंवारतेनुसार तपासणी होत आहे किंवा नाही? तसेच कंत्राटदाराच्या प्रयोग शाळेतील चाचण्यांवर नियंत्रण ठेवणे याकरिता अनुभवी सल्लागार नेमावा लागेल व त्यांचे मार्फत प्रस्तावित अस्थायी नियुक्त तांत्रिक वर्गाला तसेच म.न.पा.तील अभियंत्यांना Quality Assurance Plan निश्चित करून त्यानुसार प्रशिक्षित करणे इत्यादी करिता अंदाजे रू. २५०.०० लक्ष खर्च अपेक्षित आहे.

(अ) + (ब) चा एकूण अनुमानित खर्च रू. ४०५.०० लक्ष होईल.

प्रकल्प राशीवर २ टक्के प्रमाणे प्रकल्प सल्लागाराची नियुक्ती करिता येणारा खर्चाशी तुलना केल्यास येणारा खर्च प्रकल्पाच्या प्राकलनीय किंमतीच्या साधारणत: १.३५ ते १.५० टक्के येईल व त्यामुळे आर्थिक बचत होईल, असे प्रथमदर्शी विभागाचे निदर्शनास येते. याप्रकरणी निविदा प्राप्ती नंतरच ही बाब स्पष्ट होईल मात्र सदरील प्रस्तावाची अंमलबजावणी केल्यास म.न.पा.स पुढील प्रमाणे फायदे होईल.

१. म.न.पा.तील अभियंता वर्गातील जी चमु या प्रकल्पात कार्यरत राहील त्यांना गुणवत्तापूर्वक रस्ते बांधकाम करण्याकरिता करावयाच्या उपाययोजना, चाचण्या इ.

बाबतचे प्रत्यक्ष प्रशिक्षण प्राप्त होईल व त्यांना अशा स्वरूपाचे प्रकल्प राबविण्याकरिता भविष्यात निश्चितच लाभ होईल.

२. एक त्रयस्थ गणमान्य एजंसी या प्रकल्पाकरिता संपूर्ण गुणवत्ता राखण्याच्या दृष्टीने उपाययोजना करण्याच्या दृष्टीने योग्य नियोजन करून देणार असल्याने, या प्रकल्पात कार्यरत तांत्रिक कर्मचाऱ्यांना कौशल्यपूर्ण नियोजनाची जाणीव होईल.

३. सदर प्रकल्पाकरिता कंत्राटी तत्वावर सुशिक्षित अभियंता वर्ग या प्रकल्पावर काम करण्याची संधी याव्दारे उपलब्ध होणार असल्याने, त्यांना याव्दारे प्राप्त होणारे अनुभव पुढील सेवेकरिता निश्चितच लाभकारी ठरेल.

४. म.न.पा.चे कामावर नियंत्रण राहील तसेच कामाची गती व गुणवत्ता राखता येईल.

करिता प्रस्तावित केल्यानुसार आवश्यक तांत्रिक मनुष्यबळ उपलब्ध करून घेण्यास्तव खालील प्रमाणे प्रस्ताव मंजूर करण्याचा प्रश्न विचारात घेणे.

१. राज्य शासनाच्या सा.बा.विभागील सेवानिवृत्त उप अभियंता यांची सेवा घेण्याकरिता आवश्यक जाहिरात देणे.
२. पदवीधारक/पदवीकाधारक यांच्या सेवा उपलब्ध करून घेण्याकरिता नागपूर शहरातील अग्रगण्य संस्था व्हीएनआयटी यांना त्यांचे संस्थेतर्फे Walk -in Interview घेवून प्रकल्पापुरत्या तात्पुरत्या नेमणूकी करिता अभियंते उपलब्ध करून देण्यास विनंती करणे.
३. शासनाच्या औद्योगिक प्रशिक्षण संस्थेकडून दोन वर्षाचे प्रशिक्षण उत्तीर्ण उमेदरवारांकडून (स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक या पदाकरिता आवश्यक पात्रताधारकांपैकी ) Walk -in Interview घेवून प्रकल्पापुरत्या तात्पुरत्या नेमणूकी करिता तांत्रिक कर्मचारी उपलब्ध करून घेणे.
४. पृष्ठ क्र. ३ वर “अ” वरील तक्त्याप्रमाणे प्रस्तावित केलेल्या कॅटेगरी निहाय अभियंता/सुपरव्हाईजर यांना प्रस्तावित प्रतिमाह फिक्स्ड पे ला मान्यता देवून येणाऱ्या खर्चास मान्यता प्रदान करणे.
५. तसेच वरील संरचने प्रमाणे प्रकल्पाच्या Quality Mangement Plan करिता अनुभवी एजंसी नेमण्याकरिता येणाऱ्या एकूण ढोबळ खर्च रू. २५०.०० लक्ष मंजुरी प्रदान करणे व त्याकरिता लघुनिविदा बोलाविण्याची अनुमती प्रदान करणे.

**उपरोक्त प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.**

<u>ठराव क्रमांक 216</u>:— प्र. क्र. ४८ (अ) रेशिमबाग येथील प्लॉट नं. एन—१३९, (शेंदुरनीकर ते भिसेकर आणि श्री नरड ते सोनभद्रे) रेशिमबाग येथे डांबरीकरणाचे काम करण्याबाबत व प्र. क्र. ४८ (ब) रेशिमबाग येथील शारदा मंदीर मट्टीपुरा ते तेलंगीपुरा (गेव आवारी मागे) सिरसपेठ येथील रस्त्याचे डांबरीकरण करण्याचे कामास्तव रू. 29,99,731/— रक्कमेच्या प्राकलनास प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 217</u> :— आजच्या सभेची कार्यवाही कायम करण्यास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

यानंतर मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेची कार्यवाही अनिश्चित काळाकरिता स्थगित केली.

निगम सचिव
महानगरपालिका,नागपूर

सभापती
स्थायी समिती,
महानगरपालिका,नागपूर